४०१

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-२/मुंबई/डिपॉझीट (ठेव)/परिपत्रक/4724/१५ दिनांक :२६/०५/२०१५.

वाचावे:-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम २३.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७०.

-:परिपत्रक:-

**विषय :- उमेदवारांची ठेव (डिपॉझीट) रक्कम परत अथवा जप्त करणे बाबत.**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम २३ नुसार संस्थेचे निवडणूक प्रक्रिये दरम्यान उमेदवारास डिपॉझीटपोटी विहित केलेली रक्कम संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. निवडणूकीत भाग घेतलेल्या नामनिर्देशीत व्यक्तीने आपले नामनिर्देशन पत्र मुदतीत मागे घेतल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सदरची डिपॉझीट रक्कम संबंधीत उमेदवारास नामनिर्देशनपत्र मागे घेतल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत परत करणे अनिवार्य आहे. तसेच उर्वरीत उमेदवारांची डिपॉझीट रक्कम निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर एकतर ती ठेवणाऱ्या व्यक्तीला अथवा तिच्या वैध प्रतिनिधीला , वारसाला परत करणे अथवा निवडणूक निधीत समर्पीत करणे हे नियम ७० अन्वये संबंधीत निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कर्तव्य आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७० मधील तरतुदीनुसार जेथे मतदान झाले असेल त्या निवडणूकीत जर उमेदवार निवडून आला नसेल व त्याला पडलेल्या वैध मतांची संख्या, सर्व उमेदवारांना पडलेल्या वैध मतांच्या एकूण संख्येच्या एक दशमांशापेक्षा अधिक नसेल तर, अथवा निवडणूकीत एकापेक्षा अधिक उमेदवार निवडून येतील त्याबाबतीत पडलेल्या वैध मतांच्या एकुण संख्येला निवडावयाच्या उमेदवाराच्या संख्येने भागल्यानंतर ती एक दशमांशापेक्षा अधिक नसेल तर, त्याची डिपॉझीट रक्कम जप्त करून निवडणूक निधीत जमा करण्याची स्पष्ट तरतुद आहे.

तथापि, संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवारांची अनमात रक्कम परत अथवा जप्त करण्याचे दोन्ही कर्तव्य पार पाडण्यात कसूर करीत असल्याचे प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी/निवेदनावरून दिसून येत आहे.

सबब या परिपत्रकीय सुचनेद्वारे निर्देशीत करण्यात येते की, नियम ७० अनुसार निवडणूक डिपॉझीटपोटी जमा होणारी रक्कम संबंधीत पात्र उमेदवारांना मुदतीत परत करावी आणि ज्या उमेदवारांची डिपॉझीट रक्कम जप्त करण्यास पात्र आहे अशा रक्कमा जप्त करून त्या सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील यादीसह **राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, निवडणूक निधी (बँकेचे नाव - स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा - पुणे मुख्य, खाते क्रमांक - 34944703338)** या नावाने धनाकर्षाद्वारे (DD)/बँकर्स चेकद्वारे प्राधिकरणास समक्ष सादर करावी.

वरील सुचनेचे संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून पालन होईल याची दक्षता घ्यावी. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी या तरतुदींचे उल्लंघन केल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचारी विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ अनुसार कार्यवाहीस पात्र समजुन त्यांचे यथोचित प्रस्ताव कार्यवाहीस्तव प्राधिकरणास सादर करावेत.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने.**

(डॉ. आनंद जोगदंड) 26/5

सचिव

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

महाराष्ट्र राज्य, पुणे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रति,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत यांना कार्यवाहीस्तव**

१. कक्ष प्रमुख (सर्व)
२. सह/उप/सहा सहकारी निवडणूक आयुक्त
३. मा. सचिव यांचे लघुलेखक
४. मा. आयुक्त यांचे लघुलेखक

## विहित नमुना

### राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे नियम ७० नुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जप्त केलेल्या उमेदवार डीपॉझीट रक्कमांचा तपशील

| अ.क्र. | संस्थेचे नाव | उमेदवाराचे नाव | मतदार संघ | डिपॉझीट जप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

(डॉ. आनंद जोगदंड) २८/५
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.